खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १४१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०३ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे साताऱ्यात उद्घाटन

## राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा : मुख्यमंत्री फडणवीस






**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०२, सातारा :** राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. ताराबाई भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील आदींसह तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विश्वास पाटील यांची ‘पानिपत’ कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि ’शब्देचि रत्ने’ ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेएनयूसारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मराठी भाषेची सक्ती असेल; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. इतर भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

आपण मुख्यमंत्री असताना मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री म्हणाले की, साहित्यिकांनी राजकारणात यावे; मात्र साहित्य क्षेत्रात राजकारण आणू नये. साहित्य निर्मिती ही समाजाच्या जाणिवा विस्तारण्यासाठी असते. त्यामुळे टीका आणि गौरव या दोन्हींतून सुधारण्याचा मार्ग शोधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री म्हणाले की, आजवर झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमीपुत्र होते.

संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळ फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेताना कवी नामदेव ढसाळ, मलिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्य व नाटकांचा गौरव केला.

९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास उद्धृत करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान आणि आपल्याला लिहिते करणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जातीधर्म पक्षाचा व धर्माचा असो त्याचा दांडा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे तिचा गोंडा मराठीच असायला हवा, असे सांगतानाच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील सर्व एसटी बसस्थानके आणि रेल्वेस्थानक येथे वृत्तपत्रविक्रेते आणि पुस्तक विक्रेत्यांना पुन्हा दुकाने द्यावीत. तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर माफक दरात पुस्तक विक्रीच्या दुकानांना परवानगी द्यावी आधी मागण्या त्यांनी मांडल्या.

डॉ. ताराबाई भवाळकर यांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव कथन करताना, मराठी भाषा अधिक व्यापक होत असल्याचे सांगितले. गावखेड्यातील मुले मराठीत लेखन करत असून, गावोगावी साहित्य संमेलनांचे आयोजन होत असल्याचे चित्र आश्वासक आहे. ग्रामीण भागातही नवीन लेखक, प्रकाशक तयार होत आहेत. त्यांना प्रोत्साहन दिल्यास मराठीचा खऱ्या अर्थाने विकास होईल. प्रत्येकालाच आपल्या भावना अभिव्यक्त होता येत नाही. त्या व्यक्त करत मी फक्त समूह मनाचा आवाज झाले, असेही त्या म्हणाल्या.

स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी साहित्य संमेलनामागील भूमिका स्पष्ट करताना, शतकपूर्व साहित्य संमेलन साताऱ्यात होत असल्याचा आनंद व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होत असलेले हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मराठी साहित्य चळवळीचा आढावा घेत कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी साहित्य महामंडळ ठामपणे उभे असल्याचे सांगितले.

संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोदी कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संमेलनाची सविस्तर माहिती दिली.

साहित्य महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

# नववर्ष निमित्ताने घरी आला, अन अनर्थ झाला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलढाणा :** नववर्षाची नवी उमेद घेत, नवे संकल्प करत प्रत्येक व्यक्ती काहीतरी उराशी जिद्द स्वप्न घेत आपली सुरुवात करत असताना जिल्ह्यात मात्र एका तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याने सर्वकाही स्तब्ध होऊन गेले. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील हिंगणा काझी येथील पोलीस पाटील विनोद फासे यांचा मुलगा मल्हार उर्फ अभिजीत फासे (वय २०) हा जळगावला शिक्षण घेत होता. काही दिवसांपूर्वी तो गावी आला होता.

**▶ नेमकं काय घडलं?**

१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे १० ते ११ वाजेच्या सुमारास एक दुर्दैवी प्रसंग ओढावला. घरच्या शेतात मका काढण्यासाठी अभिजीत जातो आणि ट्रॅक्टरच्या चाकाखाली दबून त्याचा दुर्दैवी मृत्यू होतो. ही घटना रणगाव शिवारात घडली. ट्रॅक्टरवर तो सहज फक्त ट्रॅक्टर मागेपुढे करण्यासाठी बसला. ट्रॅक्टर सुरु होताच झटका बसला त्याचवेळी घात झाला. अभिजीत दोन्ही चाकांच्यामध्ये पडला. ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली डोक्याची एक बाजू व डावा हात दबल्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला आणि त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

**▶ वाचण्यासाठी झाले प्रयत्न...**

घडलेल्या घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. ताबडतोब अभिजितला वाचवण्याकरिता शर्तीचे प्रयत्न करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयात मलकापूर येथे आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केली असता मृत घोषित केले. या घटनेची माहिती उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथील डॉ. स्वाती पाटील यांच्या वतीने वॉर्ड बॉय राजू तुकाराम गोमटे यांनी पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**▶ एका पाठोपाठ**

**दुसरा अपघात...**

दुसऱ्या घटनेत देखील मलकापूर तालुक्यातील देवधाबा येथील ३० वर्षीय तरुण एका दुचाकी अपघातात जागीच ठार झाल्याची घटना घडली. ही घटना देखील १ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सात वाजेच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ नगरच्या सर्व्हिस रोडवरील मातारी जिनिंग फॅक्टरीजवळ घडली. अपघातग्रस्त तरुणाचं नाव प्रवीण संतोष कवळे (वय ३०, रा. देवदाबा) असं असल्याचं सांगण्यात येत आहे. एकंदरीत एका पाठोपाठ दोन अपघात आणि त्यातही देखील दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने नववर्षाची सुरुवात अपघाताची चाहूल देत जिल्ह्यात सर्वत्र शोककळा पसरली आहे.

# दारुच्या नशेत पत्नीला संपवलं; नागपुरात खळबळ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, नागपूर :** चारित्र्यावर संशय घेत दारुड्या पतीने पत्नीला ठार केल्याची धक्कादायक घटना शहरात समोर आली आहे. ही थरारक घटना थर्टी फर्स्टच्या रात्री यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किनखेडे लेआउट येथे घडली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी पतीला अटक केली.

**- नेमकं काय घडलं?**

रामेश्वरी देवेंद्र मानेश्वर (वय ३३) असं मृत महिलेचं नाव आहे. तर देवेंद्र मानेश्वर (वय ३८) असं अटकेतील मारेकरी पतीचं नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र हा मूळ बालाघाट येथील रहिवासी आहे. रामेश्वरी आणि त्याचं दोघांचं हे दुसरं लग्न आहे. रामेश्वरीचे आपल्या पत्नीचे एका नातेवाईकासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय देवेंद्रला आला. त्यामुळे दारू पिऊन तो नेहमी तिच्याशी वाद घालायचा, तिला मारहाण करायचा.

बुधवारी सकाळी रामेश्वरीचा भाऊ रामकिशोर मधू पाचे (वय ३५, रा. कावरापेठ) हा रामेश्वरीला भेटायला आला. देवेंद्रने मारहाण केल्याचं रामेश्वरीने रामकिशोरला सांगितलं होतं. ‘माहेरी सोडून दे’, असेही ती त्याला म्हणाली. ‘उद्या बघू’, असे म्हणत रामकिशोर तेथून निघाला.

त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी रामेश्वरी माहेरी जाण्यासाठी हट्ट धरू लागली. पण पती देवेंद्रने तिला नकार दिला. त्यानंतर त्याने दारू पिण्यासाठी रामेश्वरीकडे पैसे मागितले. रामेश्वरीने पैसे देण्यास नकार दिला. पत्नीने नकार दिल्याने देवेंद्र संतापला. त्याने शिवीगाळ करत रामेश्वरीला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने लाकडी काठीने रामेश्वरीच्या डोक्यावर वार केले. याच मारहाणीत तिचा मृत्यू झाला.

त्यानंतर रात्री ९.३० वाजताच्या सुमारास देवेंद्र रामकिशोरच्या घरी गेला. त्याने रामेश्वरी बेशुद्ध असल्याचं रामेश्वरीच्या भावाला सांगितलं. रामकिशोर आणि देवेंद्र तेथे गेले. रामेश्वरीला मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. पण डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केलं. त्यानंतर रामेश्वरीच्या भावाने रामकिशोरने यशोधरानगर पोलिसांत हत्येची तक्रार दिली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून देवेंद्रला अटक केली आहे.

# जालन्यामध्ये भीषण अपघात, काही मिनिटांत दोन्ही वाहने आगीत खाक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, जालना :** जालना जिल्ह्यातील भोकरदन येथे एक भीषण असा अपघात १ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास झाल. या अपघातामध्ये दोन्हीही वाहन पूर्णतः जळून खाक झाली आहे. १ जानेवारीला गुरुवारी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास जालना जिल्ह्यातील भोकरदन येथे भोकरदन ते सिल्लोड या मुख्य मार्गावर हॉटेल २१ समोर एक चार चाकी कार पांढऱ्या रंगाची ही उभी होती. कारचालक हा हॉटेलमध्ये काहीतरी पार्सल आणण्यासाठी गेला होता.

रोडच्या एका साईडला उभी होती त्याच वेळेस जालन्यावरून भोकरदन येथून सिल्लोडच्या दिशेने सुकलेले लाकडं घेऊन जाणारा ट्रक आला. यावेळी ट्रक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले व ट्रक हा थेट उभ्या असलेल्या कार वर जाऊन धडकला. हा अपघाताचा क्षण पूर्ण हॉटेलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे, काही क्षणात हा भीषण अपघात झाला आणि ट्रक मध्ये असलेल्या ट्रक चालकाने प्रसंग सावधानता राखत ट्रक मधून उडी मारली आणि बाहेर पडला. यावेळी ट्रक हा कार वर धडकून अपघात ग्रस्त झाला व या लाकडाच्या ट्रक खाली कार दबल्या गेली, कारने पेट घेतला, यात दोन्ही वाहने काही क्षणात पेटली. ही घटना त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी पाहिली दोन्हीही वाहनांची आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आग विझवू शकली नाही, यानंतर हॉटेल २१ मालक विकास जाधव यांनी भोकरदन अग्निशमन विभागाला याची माहिती दिली, अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत ४ ते ५तास आग विझवण्याचा प्रयत्न केला मात्र आग विझु शकली नाही ,शेवटी दोन्हीही वाहने जळून पूर्णतः खाक झाली, सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी जरी झाली नसली मात्र दोन्हीही वाहने पूर्णतः जळून खाक झाली आहे.




## पैसा, प्रलोभनांचा हा खेळ सारा

महापालिका निवडणुकांच्या सुरू असलेल्या धामधुमीत गेल्या आठवड्यातील दोन महत्त्वाच्या बातम्या तशा फारशा चर्चेत आल्याच नाहीत. नुकत्याच झालेल्या त्र्यंबकेश्वर नगर परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान एका उमेदवाराने काही मतदारांना चक्क सोने वाटले होते. कोणी म्हणेल, काहीही सांगता राव! सोन्याचे दर काय आणि कोणी इतकी मौल्यवान वस्तू कशी वाटू शकेल? पण थांबा मतदारांना सोने वाटण्याची 'क्षमता' केवळ त्र्यंबकेश्वरमध्येच आहे.

नारायण नागबली हा धार्मिक विधी जगात एकमेव याच ठिकाणी होतो आणि बक्कळ पैसा झिरपतो. नगर परिषदांच्या मतसंग्रामात याच धार्मिक गावातील एका प्रभागात नगराध्यक्ष व दोन सदस्य अशा तीन मतांसाठी ३५ हजार रुपयांचा 'उच्चांक' गाठला गेला! तर निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर हे महाशय चक्क सोन्याचा ऐवज परत मागण्यासाठी दारोदारी फिरले. मग, दिलेले 'दान' कधी परत मागतात काय, म्हणत लोकांनी सुनावले. शिव्यांची लाखोली वाहिली. बिचारा, तोंड लपवत माघारी फिरला.


दुसरी घटना बहुदा ठाणे जिल्ह्यातील असावी. पराभव झाल्यानंतर एका उमेदवाराने वाटलेले पैसे त्याची धर्मपत्नी परत मागत होती. पैशांची मागणी करणारी ही दृश्यफीत अनेकांनी पाहिली असेल. या दोन्ही घटना वरकरणी मनोरंजक असल्या तरी निवडणूक काळातील प्रलोभने, पैशांचा होणारा अतिवापर आदींबाबत कोणाही सुजाणाला चिंतन करण्यास भाग पाडणाऱ्या. सत्तेच्या हव्यासापोटी राजकीय पक्ष व नेते मतांसाठी लाचार झाल्याने अवास्तव घोषणा करतात. लोकानुनयी राजकारणाची ही स्पर्धा घृणास्पदच. परंतु, मतदारही तशीच अपेक्षा करत असतील, तोच कित्ता गिरवत असतील तर अधिक चिंतेची बाब. सोने वाटणाऱ्याची साधी तक्रार करायला कोणी धजावत नसेल तर लोकशाही व्यवस्थेचे गोडवे तरी काय गायचे? पैसे वा इतर प्रलोभने हातात येईपर्यंत मतदानासाठी बाहेर न पडणाऱ्या झुंडीच्या झुंडी सर्वच शहरे आणि गावांतही दिसतात, ही सामाजिक अधोगती नव्हे काय? राजकारणाचा स्तर घसरला, तसा मतदारांचाही सामाजिक स्तर घरंगळणे, ही शोकांतिकाच. उच्चभ्रू सोसायट्यांतही इच्छुकांकडून पेव्हर ब्लॉक, सीसीटीव्ही, ठरावीक रकमेची मागणी, सामूहिक सहलीचे आयोजन किंवा पार्ट्यांची मेजवानी आदी प्रघातांचा महापालिकांच्या रणधुमाळीतही प्रत्यय येतो. निवडून येणारा पुन्हा इकडे फिरकणार नाहीच, याची खात्री असल्याने 'इन्स्टंट' हव्यासाचा 'ट्रेंड' रुजू पाहत असावा. नैतिकता, मूल्ये, निष्ठा, बांधिलकी वगैरेचा प्रत्यय तोंडदेखलाही येत नसेल तर हे कशाचे लक्षण?

महापालिकेसाठी राजकीय पक्षांनी घेतलेल्या मुलाखतीत 'खर्च किती कराल' हाच पहिला प्रश्न इच्छुकांना विचारला गेला. उमेदवाराचे समाजकार्य, चारित्र्य, जनसंपर्क आदी दुय्यम ठरले. इच्छुकांनी कोटी-दीड कोटीच्या खर्चाची आकडेमोड सहज करून दाखवली. गावपातळीवरच्या निवडणुकीत कोणी पाच-पन्नास लाख रुपये खर्च करणार असेल निवडून आल्यानंतर तो व्याजासह वसुली करणार नाही हे कशावरून? प्रत्येक निवडणुकीत पैशांच्या वाटपात वाढ होते आहे, हेच वास्तव. छोट्या महापालिकेतसुद्धा शंभर-सव्वाशे कोटी रुपयांची उलाढाल होत असेल तर राज्यातील २९ महापालिकांचा विचार केल्यास हा आकडा किती मोठा असेल? आचारसंहितेच्या बुजगावण्याला भिण्याचे दिवसही सरले. पूर्वी उमेदवारांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकांवर प्रकाशक, प्रतींची संख्या आदी तपशील हमखास असे. तसे नसेल तर कारवाईचा इशारा निवडणूक आयोगनामक यंत्रणा देई. आज एकाही पत्रकावर तसे उल्लेख नाहीत, तरीही काही देणेघेणे नसेल तर या यंत्रणेचे अस्तित्व औपचारिकता ठरते. त्यामुळेच की काय, समाजातील मोठ्या वर्गात निवडणुकांबाबत निरुत्साह वाढतो आहे. निवडणूक फडातील चुकीचे पायंडे आपल्याला परवडणारे नाहीत. पैसा, प्रलोभनांचा खेळ लोकशाहीच्या जीवावर बेतू नये म्हणजे मिळविले!

# गुन्हेगारांचा कर्दनकाळ, महाराष्ट्र राज्याचे नवे पोलीस महासंचालक मा. सदानंद दाते

आपल्या अंगावरची खाकी वर्दीही सर्वसामान्य माणसाच्या त्याच्या हक्काच्या संरक्षणासाठीच असल्याची जाणीव आणि भान सदैव ठेवत आपल्या ३५ वर्षांच्या पोलिसी सेवेत गुंड, गुन्हेगारांचे कर्दनकाळ कठोर शिस्तीचे अधिकारी पण माणुसकी जपणारा वरिष्ठ असा लौकिक असलेले सदानंद वसंत दाते हे महाराष्ट्र राज्याचे नवे पोलीस महासंचालक झाले, हा त्यांच्या पोलीस खात्यातील निष्ठेच्या सेवेचा सन्मान आणि गौरव होय. सदानंद दाते हे नाव येताच मुंबईतल्या २६/११/२००८ या भयंकर दिवशी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी महानगरी मुंबईवर केलेला हल्ला आणि या सैतानाच्या विरोधात दाते यांनी दिलेली प्रखर झुंज दहशतवाद्यांच्या बाँब आणि गोळीबाराचा धैर्याने सामना करत कामा रुग्णालयातल्या रुग्ण, डॉक्टर्स आणि बालकांचे प्राण वाचविण्यासाठी तब्बल ४० मिनिटे दहशतवाद्यांशी दिलेली प्रखर झुंज आणि अजमल कसाबला जिवंत पकडण्यात मिळवलेल्या त्या अभूतपूर्व घटनेची आठवण येते. त्या दिवशीच्या रात्री समुद्राच्या मार्गाने मुंबईत घुसलेल्या ११ पाकिस्तानी दहशतवाद्यांनी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनसमध्ये घुसून अंदाधुंद गोळीबार केला आणि ते कामा रुग्णालयाच्या दिशेने गेल्याचे समजताच दाते यांनी आपल्या सहकाऱ्यांसह त्यांचा पाठलाग केला. रुग्णालयाच्या छतावरून गोळीबार करणाऱ्या कसाब आणि त्याचा साथीदार अबू इस्माईलला तब्बल चाळीस मिनिटे रोखून ठेवले. त्यांना छतावरून खाली येऊ दिले नाही. या दहशतवाद्यांकडून दाते आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर तुफानी अंदाधुंद गोळीबार सुरू असतानाही त्यांनी दहशहतवाद्यांवर गोळीबार करत त्याला तेथेच रोखून ठेवले. दहशतवाद्यांनी फेकलेल्या हातबाँबच्या स्फोटात दाते गंभीर जखमी झाले. त्यांच्या शरीरात बाँबच्या स्फोटामुळे शरीरात छर्रे घुसले तरी शुध्द हरपेपर्यंत रक्तबंबाळ अवस्थेत दाते झुंजत होते. त्यांच्या त्या धाडसी कारवाईने अजमल कसाबला जिवंत पकडता आले. आणि पाकिस्तानने घडविलेल्या या महा विध्वंसक कटाचा उलगडा झाला. गंभीर जखमी झालेल्या दाते यांनी सर्वसामान्य जनतेसाठी खुल्या असलेल्या केईएम रुग्णालयातच उपचार घेतले. तेथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली. शरीरातील छर्रे डॉक्टरांनी काढले. पण तरीही त्या बाँबचे काही कण अद्यापही त्यांच्या शरीरात आहेत. एक कण डोळ्याजवळही आहे. आपल्या शरीरातील त्या बाँबचे अवशेष म्हणजे रणभूमीवरून परतलेल्या शौर्याचे प्रतीक होय, असे दाते मानतात. त्यांच्या या अतुलनीय शौर्याबद्दल राष्ट्रपती पदकाने त्यांचा गौरवही झाला आहे.

मुंबईवरच्या त्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या वेळी दाते मध्य मुंबईचे उपायुक्त होते.



दहशतवाद्यांचा हल्ला त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर पण झाल्याचे समजताच ते तडकाफडकी धावून गेले. याच हल्ल्यात अशोक कामटे यांच्यासह तीन अधिकारी आणि चार पोलीस शहीद झाले होते.

१९९० मध्ये भारतीय पोलीस सेवेत दाखल दाते यांनी कार्यकदीत अनेक जातीच्या गुन्ह्यांचा तपास केला आहे तर मुंबईवरच्या हल्ल्याचा सूत्रधार तव्वूर राणा याला १८ वर्षांनी भारतात आणण्यात त्यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरले. राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या संचालकपदावरून मुक्त झाल्यानंतर ते आता महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक होत आहेत.

दाते अस्सल पुणेकर आहेत. अत्यंत गरीब आणि प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शालेय ते महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण घेतले आहे. त्यांच्या आई तेव्हा घरकाम करत तर दाते वर्तमानपत्रे टाकत असत. पुणे विद्यापीठातून ते पीएच.डी. ही झाले आहेत. उच्च विद्याविभूषित आणि पोलीस खात्यात वरिष्ठ अधिकारी असलेले दाते धाडसी, निडर, अत्यंत कर्तव्यनिष्ठ अधिकारी असले तरी अत्यंत शांत आणि विन्रम स्वभावाच्या दाते यांच्यातला खाकी वर्दीतला माणूस मात्र सदैव जागा राहिला. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे कैवारी अशी त्यांची जनमनसातील प्रतिमा आहे. वर्दीतील माणसांच्या नोंदी या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकात आपल्या पोलीस खात्यातील सेवेतल्या अनुभवांच्या आठवणी सांगितल्या आहेत. सायबर गुन्हेगारी, समाजातील वाढती व्यसनाधीनता, गुन्हेगारांच्या टोळ्या, शहरी भागातील वाढते गुन्हे अशी अनेक आव्हाने त्यांच्यासमोर असली तरीही शिस्तबध्द आणि पोलिसी प्रशासनावर जबरदस्त वचक असलेले दाते महाराष्ट्रातल्या पोलीस खात्याचा आपल्या कारभाराने लौकिक वाढवतील असा विश्वास सरकार आणि सामान्य जनतेला ही वाटतो आहे, हेच त्यांच्या नव्या नियुक्तीचे खरे यश होय..!!

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

## वाचक पत्र

### अशा भ्रष्ट सरकारी कर्मचाऱ्यांना कारागृहात डांबा!

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा १२ सहस्त्र ९०० हून अधिक सरकारी कर्मचार्यांनी अपलाभ घेतला, अशी माहिती 'माहिती अधिकारा'तून उघड़ झाली आहे. या योजनेतील अपात्र लाभार्थ्यांची संख्या एक लाखांहून अधिक झाली आहे. अशा भ्रष्ट सरकारी कर्मचार्यांना कारागृहात डांबले पाहिजे! करणार कोण हा प्रश्न निर्माण झाला आहे.

भ्रष्ट कर्मचार्यांवर आम्ही कारवाई केली तर



एकवेळ ते १२ सहस्त्र ९०० सरकारी कर्मचारी आणि त्यांचे कुटूंबिय यांची एकूण मते मिळाली नाही तरी चालतील पण मी त्यांना कारागृहात डांबणारच आणि उरलेल्या १२ कोटी जनतेच्या आणि गरजु गरीब बहीणींच्या विश्वासाला पात्र ठरेन अशी ईश्वरसाक्ष शपथ घेऊन कृती करणारा मायका लाल सर्वपक्षीय राजकीय पक्षात सापडला तर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होईल आणि भ्रष्टाचार निर्मुलनात जगात भारताची प्रतिमा उंचावेल !

मात्र, इथे कुठचाही पक्षाचे सरकार असले तरी ते सरकार काय म्हणतील,एकदा संधी देऊया बिचार्यांना...माणुसकी? जपली पाहिजे!? नाहीतर, हे सरकारी कर्मचारी आमचेच घोटाळे उघड़े पाडतील!

न्यायालयात गेलो तर सर्व रिटायर्ड होतील पण तारीख भेटणार नाही! भ्रष्टाचाराबाबत स्वातंत्र्योत्तर काळातील देशाची ही बिकट स्थिती सर्वपक्षिय राज्यकर्त्यांमुळेच निर्माण झाली आहे !

**-भूषण वाळणुसकर,**
**डोंबिवली**

### सावित्री माय

सावित्रीबाई फुलेंचे
सुचरित्रचित्ताकर्षक
संघर्षमयी रेआयुष्य
विचार हृदयस्पर्शक

ब्राह्मण विधवा मूल
स्वता घेतले दत्तक
मुलेआपली मानली
सारे अनाथ बालक

शिक्षीत केले सस्नेहे
गुणांची होई पालक
शेणराडेचिखलफेके
शुढ समाज मालक

पहिलीमहिलाशाळा
निर्मीले सार्थशिक्षक
घडवती खरामाणूस
माईसमाजसमीक्षक

संस्था जनकल्याणा
समाज सत्य शोधक
वेशांना दिलाआश्रय
ती सन्मानमार्गदर्शक

भ्रूण हत्या थांबवली
सतिप्रथेची विरोधक
विधवा पुनर्विवाहात
दृष्टी सुधारणाशोधक

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे जयंती आहे. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते.

त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला.

सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ४१४ वर्षांची गौरवशाली परंपरा; ठुणे येथे श्री विठ्ठल - रखुमाई यात्रोत्सव



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील ठुणे गावात श्री विठ्ठल – रखुमाई यात्रोत्सवाचा भक्तिमय उत्साह पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. संत गोरा कुंभार यांच्या वंशजांनी सुरू केलेल्या या ऐतिहासिक यात्रेचे यंदा ४१४ वे वर्ष असून ३० डिसेंबर २०२५ रोजी ते ०२ जानेवारी २०२६ रोजी या ४ दिवसांत हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा होत आहे. शहापूर – मुरबाड परिसरासाठी श्रद्धा आणि उत्सवाचे प्रतीक ठरलेली ठुणेची ही यात्रा केवळ तालुक्यातीलच नव्हे, तर जिल्ह्यातील भाविकांना आकर्षित करते. पौष महिन्यातील पुत्रदा एकादशीच्या निमित्ताने काढली जाणारी भव्य ग्रामदिंडी, विठ्ठल – रखुमाईची पालखी, काकडा, अभिषेक, हरिपाठ, भजन व कीर्तन यांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघालो आहे. यात्रोत्सवाच्या प्रारंभी शहापूरचे विद्यमान आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते महापूजा झाली. यात्रेनिमित्त गावात दुकाने, आकाशपाळणी, खेळणी व विविध साहसी खेळांचे संच उभारले गेले असून यात्राजत्रेची रंगत वाढली आहे. तसेच कृषी प्रदर्शन, पशुसंवर्धन मार्गदर्शन, आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरे अशा लोकहिताच्या उपक्रमांमुळे यात्रेला सामाजिक बांधिलकीची ही जोड मिळाली आहे. पुत्रप्राप्तीसाठी नवस बोलण्याची आणि नवसपूर्तीनंतर बाळाला केळी व गुळात जोखण्याची शेकडो वर्षांची परंपरा आजही श्रद्धेने पाळली जाते. यात्रेच्या शेवटच्या दिवशी पांडुरंगाच्या पादुकांची भव्य मिरवणूक, दहिहंडी व विडादानाने उत्सवाची सांगता होणार आहे. सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची ही व्यवस्था करण्यात आली आहे. भक्ती, परंपरा आणि उत्सवाचा संगम अनुभवण्यासाठी ठुणे येथील श्री विठ्ठल –रखुमाई यात्रोत्सवाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## पनवेल शहर पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी

### गहाळ झालेले १०३ मोबाईल नागरिकांना परत



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मागील काही दिवसांत नागरिकांचे गहाळ झालेले मोबाईल फोन तांत्रिकदृष्ट्या सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (सीईआयआर) प्रणालीच्या माध्यमातून शोध घेण्यात आला. या कारवाईत एकूण १५ लाख ४५ हजार रुपये किमतीचे १०३ मोबाईल फोन माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ मध्ये शोधण्यात पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या सीईआयआर पथकास यश आले आहे.

सदर शोधण्यात आलेले मोबाईल फोन भाऊसाहेब ढोले, सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नवी मुंबई यांच्या शुभहस्ते संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आले. ही कारवाई माननीय पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे, माननीय पोलीस उपायुक्त परिमंडळ–३ प्रशांत मोहिते तसेच माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजीत अभंग, पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही उत्कृष्ट कामगिरी बजावली. या पथकात, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण फडतरे; पोलीस शिपाई विशाल दुधे, सचिन कोर, किरण कराड; पोलीस हवालदार अमोल पाटील, संदेश म्हात्रे, तुषार बोरसे; पोलीस नाईक मिथुन भोसले यांनी उत्कृष्ट कार्य केले. तसेच परिमंडळ – ३ नवी मुंबई येथील पोलीस नाईक अभय सांगळे व पोलीस शिपाई प्रवीण पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या या कार्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व विश्वास निर्माण झाला असून, पनवेल शहर पोलीस सदैव नागरिकांच्या सेवेस तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## रायगड जिल्हा कारागृहात उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचा स्तुत्य उपक्रम




**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०१, अलिबाग (रायगड) :** रायगड जिल्हा कारागृह, अलिबाग येथे उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था अलिबाग यांना विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन नारायण जावळे तसेच सचिव जिल्हा व विधीसेवा प्राधिकरण, अलिबाग रायगड तेजस्विनी निराळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कारागृहाचे जेलर श्री.वारगे यांची ही प्रमुख उपस्थिती होती. तसेच अलिबाग रायगड कारागृहात ऐकूण १७८ कैदी उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती उज्ज्वला चंदनशिव यांनी कारागृहातील महिला बंदींकरिता दैनंदिन वापराच्या आवश्यक साहित्याचे मोफत वाटप केले होते.

या सामाजिक जाणिवेच्या उपक्रमाबद्दल माननीय जिल्हाधिकारी किशन जावळे साहेब यांनी संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव यांचे विशेष कौतुक करत आभार मानले. यावेळी जिल्हाधिकारी किशन नारायण जावळे यांनी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत, आगामी एक वर्षासाठी अलिबाग जिल्हा कारागृहातील महिला बंदी करिता योग व प्राणायाम वर्ग सुरू करण्यास अधिकृत परवानगी दिली. हा उपक्रम त्यांना अत्यंत आवडल्याचे सांगून, पुढील काळातही संस्थेने असेच सामाजिक सहकार्य सुरू ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, सचिव डॉ.राजाराम हुलवान, खजिनदार डॉ.नितिन गांधी तसेच संपूर्ण उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात आले आणि संस्थेच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी या नववर्षाच्या प्रारंभी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेस मिळालेली ही परवानगी म्हणजे संस्थेच्या सामाजिक कार्यातील एक नवी पर्वणी ठरली आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथील सौरऊर्जा प्रकल्प अखेर कार्यान्वित

### सरपंच अरुणा खिलारी यांच्या पाठपुराव्याला यश; सौर ऊर्जा प्रकल्पाची शेतकऱ्यांना मिळाली ऊर्जा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणा खिलारी पाटील यांच्या पुढाकारातून मंजूर होऊन मार्गी लागलेल्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील सौरऊर्जा प्रकल्प एक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर आज अखेर कार्यान्वित झाला. सोलर पार्कचे आवादा कंपनीचे नंद व तिवारी यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण नुकतेच पार पडले.

या सौरऊर्जा प्रकल्पामुळे टाकळी ढोकेश्वर येथील विद्युत उपकेंद्रामार्फत सुमारे २१ गावांतील वीजेचा प्रश्न मिटला असून, शेतकर्यांना दिवसा वीज पुरवठ्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या भागातील शेती सिंचनाची समस्या मार्गी लागणार असून, लोडशेडिंगचा ही ताण गेला आहे. या प्रकल्पामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

सरपंच अरुणा खिलारी यांच्या सातत्यपूर्ण विशेष प्रयत्नांचे यश मानले जात आहे. शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन मागणीला यश मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन आमदार व विद्यमान खासदार निलेश लंके यांनी पारनेर मतदारसंघात शेतकऱ्यांच्या हितासाठी सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा महत्वकांक्षी निर्णाण घेतला.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत टाकळी ढोकेश्वर येथे सोलर पार्कची उभारणी झाली असून, त्याचे लोकार्पण आज माजी सरपंच शिवाजी खिलारी, सामाजिक कार्यकर्ते संजय झावरे, दौलत जेजुरकर, छोटूभाई हवलदार, सचिन चिकने व शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत करण्यात आले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजने अंतर्गत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प दिला आहे.

या सोलरपार्क निर्मितीसाठी कोट्यवधी रुपयांपेक्षा जास्त रकमेची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. या सोलर पार्कची विद्युत निर्मिती क्षमता ९ मेगावॅट असून, या सोलरपार्कमधून निर्माण होणारा ९ मेगावॅट विद्युतचा पुरवठा टाकळी ढोकेश्वर येथील विद्युत उपकेंद्रास होणार आहे. त्यापासून गावांमधील नागरिक व शेतकरी यांना विजेचा अखंडित पुरवठा होण्यास मदत होणार असल्याचे नंद व तिवारी यांनी सांगितले.

### अरुणा खिलारी यांचे यश



महाविकास आघाडी सरकारच्या काळात टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीने ५० एकर जमीन या प्रकल्पासाठी दिली होती. सरपंच अरुणा खिलारी यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा प्रकल्प पूर्णत्वाला गेला. मात्र राजकीय उदासीनता आणि स्वार्थी वृत्तीमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळण्यास उशीर झाला. खिलारी यांनी शेतकऱ्यांसाठी सातत्याने आवाज उठवला आणि त्यांच्या संघर्षामुळे आज हे स्वप्न साकार झाले. ग्रामस्थांनी त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

-----------------------------------------

टाकळी ढोकेश्वर सौरऊर्जा प्रकल्पाची क्षमता ९ मेगावॅट असून, वेगळे सौरऊर्जा ट्रान्सफॉर्मरद्वारे टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकऱ्यांना सकाळी ते संध्याकाळपर्यंत शेतीसाठी दिवसा विजेचा लाभ मिळणार आहे. दिनांक ३० डिसेंबर २०२५ पासून वीजपुरवठा सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह संचारला आहे.

# कर्तव्यात कसर केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही - आ.आवताडे

### मंगळवेढा पंचायत समिती प्रशासकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** कामात व कर्तव्यात कोणत्याही प्रकारे कसर करून मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्यास मी कोणाचीही गय करणारा आमदार नाही. त्यामुळे प्रत्येक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापल्या कर्तव्य सेवेशी प्रामाणिक राहून सातत्यपूर्ण कामातून जनतेच्या व तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला योगदान दिले पाहिजे असे मत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या प्रमुख उपस्थितीमध्ये मंगळवेढा पंचायत समिती प्रशासकीय अधिकारी वर्गाची आढावा बैठक जोगेश्वरी मंगल कार्यालय मंगळवेढा येथे संपन्न झाली. त्याप्रसंगी ते प्रत्येक शासकीय विभागांच्या विविध बाबींचा आढावा घेत असताना बोलत होते.

बैठकीत सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण, रोजगार हमी योजनेसह विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच, नागरिकांशी संबंधित योजना वेळेत व प्रभावीपणे




राबवणे, प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करणे आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याबाबत स्पष्ट सूचना आमदार आवताडे यांनी दिल्या. ग्रामीण भागातील विकासकामांना गती देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे, हाच या बैठकीचा मुख्य उद्देश होता. समन्वय, पारदर्शकता आणि जबाबदारीच्या भावनेतून काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, तालुक्यात राबवण्यात येणारी जलजीवन मिशन योजना, भोसे प्रादेशिक योजना, आंधळगाव प्रादेशिक योजना आणि घरकुल आणि विहीर योजनांचे लाभार्थी तसेच आरोग्य व शिक्षण या विषयांचा सविस्तर आढावा घेत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. मंगळवेढा तालुक्यात प्रशासकीय पातळीवरती सुरू असलेल्या कामांना गती देण्याचा आणि ती कामे वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्याचा प्रशासकीय यंत्रणेचा मानस असला पाहिजे त्यासाठी सर्वांनी लोकाभिमुख कर्तव्य सेवेला प्राधान्य द्या अशा सूचना आमदार आवताडे यांनी यावेळी दिल्या आहेत. बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी श्रीमती जस्मिन शेख नूतन नगरसेवक प्रा.येताळा भगत, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष रामेश्वर मासाळ, भाजपा तालुकाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, काशिनाथ पाटील, सरोज काझी, सुधाकर मासाळ, माजी उपसभापती रमेश भांजे, शिवाजीराव पटाप, माजी पंचायत समिती सदस्य नितीन पाटील, माजी उपसभापती धनंजय पाटील, संचालक गौडाप्पा बिराजदार, महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे कार्याध्यक्ष ॲड.शिवानंद पाटील, माजी सरपंच काका मिसकर आदी व सर्व विभागांचे अधिकारी तसेच विविध गावांचे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक, ग्रामस्थ, पदाधिकारी उपस्थित होते.

## विंचूर ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक राजेंद्र शिंदे यांना 'आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी' पुरस्काराने केले सन्मानित



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** नाशिक आयटक (AITUC) संलग्न ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात, विंचूर ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक राजेंद्र पोपटराव शिंदे यांना मानाचा 'आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. नाशिक येथील ग्रामसेवक भवन येथे कॉम्रेड निकम बाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त या विशेष आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

नाशिक जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड सखाराम दुर्गुडे साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. तसेच निफाड तालुका अध्यक्ष किशोर मिंडे आणि निफाड तालुका सल्लागार कैलास टिळे यांच्या विशेष पुढाकाराने हा सोहळा उत्साहात संपन्न झाला. राजेंद्र शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात बजावलेल्या अत्यंत तत्पर आणि प्रामाणिक सेवेची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यास मिलिंद वाघ, मनोज चव्हाण, रामदास चव्हाण, दत्तात्रय खाडे, मयूर जाधव आदी कर्मचारी उपस्थित होते. शिंदे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विंचूर गावामध्ये त्यांना अनेक ठिकाणी आनंदाने शुभेच्छा देण्यात आल्या आहे. या यशाबद्दल विंचूर ग्रामपालिकेत मासिक सभेच्या वेळी ग्रामपंचायतीचे सरपंच सचिन दरेकर, उपसरपंच प्रवीण चव्हाण, ग्रामसेवक रा.म.मगर, सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी शिंदे यांचा विशेष सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नैताळा येथील श्री मतोबा महाराज यात्रोत्सवानिमित्त आरोग्य विभाग सज्ज

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील नाशिक – श्री छत्रपती संभाजी नगर हैवे वरील नैताळा येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मतोबा महाराजांच्या येत्या ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या वार्षिक यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, नैताळे यांच्या वतीने सर्वंकष आरोग्य व्यवस्था सज्ज करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम चारुडे यांनी दिली.यात्रा काळात आजारपण, अपघात, अचानक प्रकृती बिघडणे तसेच जलजन्य व कीटकजन्य आजारांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व गटप्रवर्तकांची विशेष बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. यंत्रणेची तयारी तपासण्यासाठी मॉक ड्रिल्स ही घेण्यात आल्या. जिल्हास्तरावरून मोठ्या प्रमाणावर औषधसाठ्याची मागणी करण्यात आली असून बहुतांश औषधे उपलब्ध झाली आहेत. ए.आर.व्ही व ए.एस.व्ही इंजेक्शनसह आपत्कालीन उपचारासाठी आवश्यक सर्व औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध आहेत.यात्रा कालावधीत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी २४ तास कार्यरत राहतील, अशा पद्धतीने ड्युटी नियोजन करण्यात आले आहे. तसेच १०८ व १०२ ॲम्बुलन्स सेवा २४ तास उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची तपासणी करून पाणी शुद्धीकरण, टीसीएल साठा तपासणी तसेच ग्रामपंचायतीला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अन्नविषबाधा टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाशी समन्वय साधण्यात आला असून यात्रेच्या काळात फूड स्टॉल्स व हॉटेल चालकांना स्वच्छता व अन्नसुरक्षा नियम पाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो, टायफॉईड यांसारख्या आजारांपासून बचावासाठी जनजागृती व स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, यात्रेच्या काळात साथरोग नियंत्रण कक्ष २४ तास सुरू ठेवण्यात आला असून डॉ. सुरज टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरीय पर्यवेक्षक वाणी नाना यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष कार्यरत राहणार आहे. भाविकांनी स्वच्छ पाणी व अन्न सेवन करावे तसेच कोणतीही आरोग्य समस्या उद्भवल्यास तात्काळ आरोग्य कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

